| | |
|---|---|
| MHGA030000742018 | दाखल तारीख : १६.०१.२०१८<br>नोंदणी तारीख : १६.०१.२०१८<br>निकालतारीख : १३.०५.२०२६<br>कालावधी : ०८ वर्ष, ०३ म., २८ दि.<br><br>**निशाणी क्रमांक : ९४** |

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**समक्ष : श्रीमती वासंती. र. मालोदे**<br>**न्यायनिर्णय पारीत दिनांक : १३/०५/२०२६**<br>**संक्षिप्त फौजदारी मामला क्रं.५१/२०१८** |
| | **गुन्हा क्र.६२३१/२०१६** |
| फिर्यादी/तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे, गडचिरोली,<br>ता.जि. गडचिरोली. |
| आरोपी | **१. विप्लब सुनिल सेन,**<br>वय : २९ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>**२. सुश्मिता अविनाश चौधरी,**<br>वय : ४४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>दोघे राह. येवली, ता., जि. गडचिरोली.<br>**३. बिकास विमल मंडल, (फरार)**<br>वय : ३७ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>राह. वैकुंटनगर, पी. व्ही. १९, पाखांजूर,<br>जि. कांकेर, छत्तीसगड |
| आ.क्र.१ ते ३ तर्फे विद्वान विधिज्ञ | श्री आर.पी. टेंभूर्णे, |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २२.१०.२०१६ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | २२.१०.२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १६.०१.२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १०.१०.२०१९ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०८.११.२०१९ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची | …….. |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दाखल केलेसह | निर्दोष सुटला की नाही किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४२८ अन्वये खटल्यामध्ये न्यायालयाच्या कक्षेदरम्यान तुरुगांत राहल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **विप्लब सुनिल सेन,** | आरोपीला अटक करण्यात आली नाही आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले | ०३.१०.२०१९ | ६५(ई), ९८(क), ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | **सुश्मिता अविनाश चौधरी,** | आरोपीला अटक करण्यात आली नाही आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले | २३.०८.२०१९ | ६५(ई), ९८(क), ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | **बिकास विमल मंडल,** | आरोपीला अटक करण्यात आली नाही आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले | २७.०९.२०१७ | ६५(ई), ९८(क), ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग - क

**अ. अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सरकारी पक्षाचे सा.क्र.१ | प्रितम दिवाकर पाकमोडे | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| सरकारी पक्षाचे सा.क्र.२ | विजय दिगांबर राउुत | पोलिस साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| स्रकारी पक्षाचे सा.क्र.३ | दिलीप केये गावडे | नमुना वाहक/पोलीस साक्षीदार |
| सरकारी पक्षाचे सा.क्र.४ | तेजराम भुसारी जनबंधू | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असेल:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल:**

न्या.प्र.श्रेणी.
(न्या.क्र.१)
गडचिरोली

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>सरकारी पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशानीची यादी</u>**

**ब. सरकारी पक्ष**

| **अ.क्र.** | **निशानी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.५३-ब- सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | नि.क्र.५९ - सा.क्र.२ | जप्ती पंचनामा |
| ३. | नि.क्र.६० - सा.क्र.२ | फिर्याद |
| ४. | नि.क्र.६१ - सा.क्र.२ | छापील पहिली खबर |
| ५. | नि.क्र.८५- सा.क्र.३ | पोच पावती |
| ६. | नि.क्र.८६- सा.क्र.३ | पत्र |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्रं | निशानी क्रं. | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशानी**

| अ.क्रं | निशानी क्रं. | विवरण |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. भौतिक वस्तू**

| अ.क्रं | वस्तूचे क्रं | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(दिनांक १३.०५.२०२६ रोजी पारीत)

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई), ९८(क), ८३ अन्वये खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांचा तर आरोपीतर्फे त्यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यासंबंधी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक २२.१०.२०१६ रोजी ११.४५ वाजताच्या दरम्यान मौजा गडचिरोली ते चामोर्शी रोडवरील वाकडी फाटयाजवळील आरोपी क्रमांक १ ते ३ हे त्यांच्या ताब्यात अवैधरीत्या गोवा डिलक्स व्हिस्की कंपनीच्या, १८० मिली मापाच्या एकुण ९६ सिलबंद निपा दुचाकी वाहन सीडी-१०० या वाहनावरुन अवैधरीत्या आपसात कट रचुन वाहतुक करीत होते, त्याअन्वये त्यांनी कलम ६५(ई), ९८(क), ८३, महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमान्वे गुन्हा केला आहे काय ? | **...नाही.** |
| २. आदेश काय ? | **...अंतिम आदेशानुसार.** |

## का र ण मि मां सा

२. सदर प्रकरणात अभियोजन पक्षातर्फे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण चार साक्षीदार तपासण्यात आले. प्रकरण प्रलंबित असतांना आरोपी क्र.३ हा फरार झाल्याने आरोपी क्र.१ आणि २ चे प्रकरण नि.क्र.७६ वरील आदेशानुसार आरोपी क्र.३ पासून वेगळे चालविण्यात आले. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविल्यानंतर, नि.क्र.१ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपींचे कलम ३१३(१)(ब) फौ.प्र.सं. नुसारचे बयान नोंदविण्यात आले. त्यात त्यांनी सर्व साक्षीदारांचे बयान नाकारुन त्यांचेविरुध्द खोटे प्रकरण दाखल केल्याचे कथन केले. आरोपींनी स्वत:तर्फे बचावाचे साक्षदार तपासले नाही.

**<u>मुद्दा क्र.1 करीता :-</u>**

३. घटनास्थळ पंच प्रितम पाकमोडे (अ.भि.सा.क्र.१) हा पंच साक्षीदार असुन दिनांक २२/१०/२०१६ रोजी पोलिसांनी त्यांना एसडीपीओ कार्यालय येथे पंच म्हणुन बोलाविले. त्यांना वाकडी फाटयजवळ दारु येणार आहे म्हणुन पंच म्हणुन घेवून गेले. तेथे वाट पाहत बसलो. तेथे ते हजर असतांना एक दुचाकी होंडा सीडी-१०० या वाहनावर तिन इसम येतांना दिसले. त्यांना पाहून ते इसम पळून गेले. त्यांचा पाठलाग केला असता, एका व्यक्तिला पकडण्यात आले. त्या वाहनावरील एका चुंगडीत गोवा व्हिस्की दारु, १८० मिलीच्या १०० निपा मिळुन आल्या. त्यानंतर, पोलिसांनी त्या जप्त करुन सदर साक्षीदारांसमक्ष पंचनाम्याची कार्यवाही करुन त्याची सही घेतली. त्यांनी नि.क्र.५३-ब म्हणजेच घटनास्थळ पंचनामामधील त्यांची सही आणि मजकुर बरोबर असल्याचे त्याने सांगितले. त्यांची साक्ष सुरु असतांना, न्यायालयात हजर तिन आरोपीपैकी पहिल्या आरोपीकडे इशारा करुन त्याचे नाव विकास मंडल असल्याचे आणि त्याचे ताब्यातून दारु जप्त केल्याचे सदर साक्षीदाराने कथन केले.

४. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान, पोलिसांनी त्यांना पंचनाम्याकरीता नोटीस दिली नव्हती. ते घटनास्थळावर सरकारी वाहनाने गेले होते. त्यांच्या उलटतपासावरुन असे दिसुन येते की, ते पोलिस स्टेशनमध्ये विशेष पोलिस अधिकारी म्हणुन काम करतात. यावरुन, सदर साक्षीदार हा स्वतंत्र साक्षीदार आहे, असे म्हणता येणार नाही, कारण तो पोलिस स्टेशनमध्ये काम करणारा साक्षीदार असल्याचे दिसुन येते. दुसरीकडे, जर पंचनाम्याची कार्यवाही पंच म्हणुन त्यांच्यासमक्ष झाली असती, तर त्यांनी कार्यवाहीबाबत संपूर्ण कथन करणे आवश्यक होते. परंतु, सदर साक्षीदाराने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यवाहीबाबत काहीही सांगितले नाही. याउलट, आरोपी हे घटनास्थळावरुन पळून गेले. त्यानंतर, जेव्हा आरोपींना पकडण्यात आले, तेव्हा त्यांचे पोलिसांनी नाव, गाव विचारल्याबाबत आणि अंगझडतीबाबत काहीही कथन केलेले नाही. घटनास्थळ जप्ती पंचनामा म्हणजेच नि.क्र.५३-ब नुसार नमुद मजकुरामध्ये जप्ती ही तिन्ही आरोपींच्या ताब्यातून दाखविण्यात आली. परंतु, सदर साक्षीदार यांनी फक्त आरोपी विकास मंडल यालाच साक्षीदरम्यान ओळखले. यावरुन, त्याच्यासमक्ष झालेली जप्तीची कार्यवाही सिध्द होत नाही. त्याचप्रमाणे, पोलिसांनी घ टनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांचे बयाण सुध्दा नोंदविले नव्हते.

५. फिर्यादी विजय राउुत (अ.सा.क्रं.२) यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक

२२/१०/२०१६ रोजी त्यांना गुप्त माहिती मिळाली होती की, छत्तीसगडकडून तिन इसम अवैध दारुची वाहतुक करुन येवली येथे विक्री करणार आहेत. त्यानुसार, वरीष्ठांना माहिती देवून ते सरकारी वाहन क्रमांक एम.एच.३३/सी-४४० ने वाकडी फाटयाजवळ दबा धरुन बसले असतांना रात्री ९.०० वाजताच्या सुमारास एका दुचाकी वाहनावर तिन इसम येतांना दिसले. त्यांना पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला असता, ते चामोर्शी मार्गाने निघून गेले. त्यांचा पाठलाग केला असता, काही अंतरावर एक दुचाकी वाहन थांबले. त्यातील एक इसम त्याच्या खांद्यावर दोन चुंगडया घेवून पळून गेला. वाहन चालक आणि मागे बसलेली स्त्रि चामोर्शीच्या दिशेने दुचाकीवर निघून गेले. त्यानंतर, जंगलात पळून गेलेल्या इसमाचा पाठलाग केला असता, त्याला पकडून नाव, गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव विप्लब सेन असे सांगितले तसेच पळून गेलेल्या इसमाचे नाव विकास मंडल आणि स्त्रिचे नाव सुस्मिता चौधरी असे सांगितले. पंचांसमक्ष आरोपी विपल्ब सेनच्या चुंगडीची पाहणी केली असता, त्यात १८० मिलीच्या गोल्डन गोवा व्हिस्की कंपनीच्या ९६ निपा मिळुन आल्या. त्यातील एक निप रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढून त्यांवर पंचांच्या आणि त्यांच्या स्वत:च्या सहीचे लेबल लावून वेगळे करण्यात आले. तसेच, घटनास्थळ पंचनामा आणि माल जप्ती पंचनामा नि.क्र. ५३-ब तयार करण्यात आला.

६. त्यानंतर, सदर साक्षीदार आरोपी विप्लबला घेवून पोलिस स्टेशनला गेले आणि त्याच्याविरुध्द नि.क्र.६० आणि ६१ नुसार फिर्याद दिली. त्यानंतर, सि.ए. फार्म तयार केला. त्यांच्या सांगण्यानुसार पंचनाम्याची कार्यवाही सकाळी केली. साक्षीदार क्र.१ प्रितम यांच्या साक्षीनुसार पंचनाम्याची कार्यवाही रात्री करण्यात आली होती. यावरुन दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीमधून पंचनाम्याच्या कार्यवाहीच्या वेळेबाबत विसंगती दिसुन येते.

७. नमुना वाहक, दिलीप गावडे (अ.भि.सा.क्र.३) यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्यांची नमुना रासायनिक प्रयोगशाळा नमुने नेण्याकरिता दिनांक २४/१०/२०१६ रोजी डयुटी लागली. त्यानुसार, त्यांना पत्र, सि.ए. फार्म, बाहेर गाव डयुटी पास आणि या गुन्हयातील नमुन्यासह एकुण ७ नमुने मिळाले. त्यानुसार, त्यांनी बसने जावून न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेत जावून ते नमुने जमा केले. त्याबाबतची पोच पावती नि.क्र.८५ त्यांना मिळाली. परत आल्यानंतर त्यांनी सर्व दस्त मुद्देमाल मोहर्ररकडे जमा केले. त्यांना मिळालेले पत्र आणि वापसी रिपोर्ट म्हणजे नि.क्र.८६ मधील मजकुर त्यांनी बरोबर असल्याचे सांगितले. त्याच्या

उलटतपासावरुन असे दिसुन येते की, त्यांनी परत आल्यानंतर, पोलिस स्टेशनला आंमद दिली. परंतु, ती अभिलेखावर दाखल असल्याचे दिसुन येत नाही. सदर साक्षीदार हा नमुना वाहक असल्याने त्याने दिलेल्या कर्तव्यानुसार नमुने रासायनिक प्रयोगशाळेत जमा केले होते. या गुन्हयातील किती नमुने त्यांनी प्रयोगशाळेमध्ये जमा केले, याबाबत कुठेही स्पष्टपणे सांगितले नाही. त्यांच्या बयाणाचे अवलोकन केले असता, त्यांनी फक्त पोच पावती पोलिस स्टेशन मोहर्ररकडे जमा केल्याचे दिसुन येते. यावरुन, त्यांनी नियमानुसार सर्व दस्त पोलिस स्टेशनला परत दिल्याचे दिसुन येत नाही.

८. तेजराम जनबंधू, (अ.भि.सा.क्र.४) हे तपासी अधिकारी असुन दिनांक २२/१०/२०१६ ला त्यांना अपराध क्रमांक ६२३१/२०१६ च्या तपासाचे दस्त प्राप्त झाले. त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले. त्यानंतर, त्यांची बदली झाल्याने पुढील कार्यवाही श्री बोधलकर यांनी केली. सदर साक्षीदार हा प्राथमिक तपासी अधिकारी असुन त्यांनी फक्त प्राथमिक तपास केल्याचे दिसुन येते. या व्यतिरीक्त इतर तपासी अधिकारी नामे केशव बोधलकर यांचा मृत्यू झाल्याने त्यांची साक्ष अभिलेखावर आली नाही.

९. साक्षीदार क्रमांक १ पंच साक्षीदार असुन तिने जप्तीविषयी सखोल कथन केले नाही, त्याचप्रमाणे जप्ती मुद्देमालाचा बॅच क्रमांक त्याला माहिती नसल्याचे दिसुन येते. त्यांनी ज्याच्या ताब्यातून जप्ती झाली, त्या आरोपीचे नाव विकास मंडल असे सांगितले, जेव्हा की, साक्षीदार क्र.२ म्हणजेच फिर्यादी यांनी झालेली जप्ती ही आरोपी विप्लव सेन याच्या ताब्यातून झाल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत, पंचसाक्षीदार यांची साक्ष आरोपीविरुध्द गुन्हा साबित करण्याइतपत पुरेशी दिसुन येत नाही. कारण, सदर पंच साक्षीदार ही कार्यवाहीबाबतची प्रत्य क्षदर्शी साक्षीदार असल्याने त्याने कार्यवाहीबाबत संपुर्णपणे नमुद करणे अपेक्षीत होते, परंतु पोलीसांनी दिलेल्या कार्यवाहीचे त्याने विस्तृत वर्णन अभियोग पक्षाच्या कथनानुसार केलेले नाही. तसेच पंचनाम्याच्या कार्यवाहीबाबत सुध्दा अभियोग पक्षाचे साक्षीदार यांचे साक्षीमध्ये विसंगती दिसुन येते. इतरत्र साक्षीदार हे पोलीस कर्मी असून त्यांनी केलेल्या कार्यवाहीनुसार त्यांच्या साक्षेदरम्यान कथन केले आहे. नमुना वाहक यांनी या गुन्हयातील नेमके किती नमुने रा.वि. करिता नेले होते हे त्यांच्या साक्षेवरून सिध्द होत नाही. कारण की, ही बाब त्यांच्या बयाणामध्ये सुध्दा नमुद नाही. नमुना वाहक यांनी मुददेमाल मोहरर्रकडून नमुना स्विकारतांना स्विकृत केल्याबाबतचा शेरा दिला नव्हता किंवा कुठल्याही दस्तऐवजावर सही केली नव्हती. या सर्व बाबी

जप्त नमुना हा किती होता आणि कुठल्या परिस्थीतीत रा.वि.प्रयोगशाळेत नेण्यात आला ही स्पष्टता अभियोग पक्षाने सिध्द केली नाही. प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल असुन सिध्द झाला नाही. यावरून अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या बयाणामध्ये वांरवार आलेल्या विसंगती मुळे अभियोग पक्ष आरोपींविरूध्द गुन्हा साबीत करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्रं.२ करिता :-</u>**

१०. वर उल्लेखलेल्या प्रमाणे दोन्ही आरोपीविरुध्द अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जावून गुन्हा सिध्द केला नाही. जप्त मुद्देमाल विदेशी दारू अपील कालावधीनंतर विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावे असे आदेशित करणे उचित ठरते. म्हणुन मी मुददा क्रं.२ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१ **विप्लब सुनिल सेन** व आरोपी क्र.२ **सुश्मिता अविनाश चौधरी**, यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम-६५(ई), ९८(क), ८३ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-२५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-४३७(अ) प्रमाणे जामीनाची पुर्तता करावी.

३. आरोपी क्र.३ विकास विमल मंडल याला प्रकरणातून दोषमुक्त करण्यात येते. त्याच्याविरुध्द असेलेले वॉरंट परत मागविण्यात येते.

४. प्रकरणात जप्त मुद्देमाल विदेशी दारू अपील कालावधीनंतर, विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

५. जप्त दुचाकी वाहनाचे अपिल कालावधीनंतर, नियमानुसार विल्हेवाट लावावी किंवा योग्य त्या इसमास पडताळणीनंतर परत करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

VASANTI RAGHUNATH MALODE
Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE
Date: 2026.05.13 17:42:40 +0530

स्थळ : गडचिरोली.
दिनांक : १३/०५/२०२६

**(व्ही.आर.मालोदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), गडचिरोली.